


follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd. No. 72105/99 • वर्ष २६ • अंक ३४१ • बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४ • पाने ४ • किंमत ५/-


# विधानसभा निवडणुका नोव्हेंबरमध्ये




**मुंबई:** राज्यात विधानसभा निवडणूक लांबणीवर जात असल्याबद्दल विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर होणाऱ्या टिकेपासून ते राष्ट्रपती राजवटींच्या चर्चापर्यंत घडामोडी घडत असतानाच राज्य निवडणूक आयोग मात्र निवडणुकीच्या तयारीला लागल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे नोव्हेंबर महिन्यात राज्यात निवडणुका पार पडतील, अशी लक्षणे आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्याच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनी १३ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांची दूरदृश्य पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) बैठक आयोजित केली आहे. या बैठकीत त्यांच्याकडून जिल्हा स्तरावरील निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतला जाणार आहे.

मागील तब्बल तीन कार्यकाळात हरियाणा आणि महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी होत आहेत. यावेळी मात्र हरियाणा आणि जम्मू काश्मीरच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या तरीही महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झालेला नाही. लोकसभा निवडणुकीत महायुतीला फारशी चमकदार कामगिरी करता आलेली नाही. उलट विरोधी महाविकास आघाडीने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. मतदारांचा हा कल कायम राहिल्यास विधानसभा निवडणुकीत महायुतीला फटका बसू शकतो, या भीतीने सत्ताधाऱ्यांकडून निवडणूक लांबवली जात असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. निवडणूक लांबणीवर टाकून विधानसभेचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर काही काळ राष्ट्रपती राजवट लागू केली जाईल, अशाही चर्चा आहेत.

मात्र, सत्ताधाऱ्यांकडून या आरोपाचे खंडन केले जात आहे. विधानसभा निवडणूक गृहीत धरून राजकीय पक्षांच्या हालचालीही सुरू आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपाच्या चर्चा सुरू आहेत. सुमारे एक आठवड्याच्या कालावधीत जागावाटपाचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे. उमेदवारी मिळण्या न मिळण्याच्या संभावनेतून राजकीय पक्षांमध्ये आवक जावकही मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. आता खुद्द राज्य निवडणूक आयोगच कंबर कसून कामाला लागल्याचे चित्र दिसत असल्यामुळे नोव्हेंबर मध्ये विधानसभा निवडणूक पार पडणार, हे निश्चित मानले जात आहे.

## 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'साठी ज्येष्ठ नागरिकांनी अर्ज करण्याचे राज्य शासनाचे आवाहन!

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यातील सर्व धर्मीयांमधील ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे. यामध्ये देशातील एकूण ७३ तीर्थ क्षेत्रे आणि महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. यासाठी अर्ज करण्याचे आवाहन राज्य शासनाने केले आहे. जाणून घ्या पात्रता निकष

राज्यातील सर्व धर्मीयांमधील ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे. भारतातील एकूण ७३ तीर्थ क्षेत्रे आणि महाराष्ट्र राज्यातील ६६ तीर्थक्षेत्रांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला आहे. या योजनेनुसार राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र दर्शन यात्रा मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. या योजनेच्या लाभासाठी ज्येष्ठ नागरिकांनी संबंधित जिल्ह्यातील जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याचे आवाहन सामाजिक न्याय विभागाने केले आहे.

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचे लाभ स्वरूप

मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेंतर्गत जिल्हानिहाय निश्चित केलेल्या कोट्याच्या आधारे लॉटरी पद्धतीने निवड होणार आहे. निवड

## पुणे-सातारा मार्गावर शिवशाही बसने घेतला पेट

**सातारा :** स्वारगेटवरून पुणे बेंगलोर महामार्गावरून सांगलीकडे निघालेल्या शिवशाही बसला वाढेफाटा परिसरात टायर फुटून अचानक आग लागली. यामुळे महामार्गावर एकच गोंधळ उडाला. दुपारी एकच्या दरम्यान ही घटना घडली. सातारा पालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी जाऊन आग आटोक्यात आणली. सुर्दैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

पुणे-बेंगलोर महामार्गावर नेहमीप्रमाणे वर्दळ सुरु होती. सांगली आगाराची शिवशाही बस स्वारगेटवरून सकाळी साडेनऊच्या सुमारास निघाली. गाडी वाढे फाटा परिसरात आली असता गाडीचा मागील टायर अचानक फुटून मोठा आवाज झाला. गाडी पंक्चर झाल्यामुळे सर्व प्रवासी तातडीने बस बाहेर उतरत असताना अचानक डाव्या बाजूने गाडीने पेट घेतला. काही वेळात आगीने रौद्ररूप धारण केले. खबरदारीचा उपाय म्हणून महामार्ग पोलीस, सातारा तालुका पोलीस यांनी घटनास्थळी धाव घेऊन दोन्ही बाजूची वाहतूक थांबवली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## १०० टक्के फेलोशीपचा जी आर अखेर निघाला

बार्टीकडील अनुसूचित जातींच्या ७६३ पीएचडी संशोधकांना १०० टक्के फेलोशीप देणारा ' जीआर ' आज शिंदे सरकारने काढला!

त्या संशोधकांचा प्रश्न प्रदीर्घ लढ्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्याशी थेट बातचीत करून समजून घेतला. तसेच लगोलग कॅबिनेटमध्ये निर्णय घेवून एकदाचा मार्गी लावला. जीआरमुळे संशोधकांच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यांनी आपले घरदार, कुटुंब, अभ्यास वाऱ्यावर सोडून देत या लढ्यात न्यायासाठी आपले ' शिक्षण ' च पणाला लावले होते.

सामान्य कुटुंबातील पार्श्वभूमी, शिवसेनेच्या मुशीतली जडणघडण आणि तळातील अगदी शेवटच्या माणसाला न्याय देण्याचे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे संस्कार यातून एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व आकाराला आले आहे. त्यामुळेच बार्टीच्या फेलोशीप वंचित संशोधकांच्या लढ्याची कदर होऊन लागोपाठ त्यांच्या दुसऱ्या बॅचलाही न्याय मिळू शकला आहे. शिवाय, दलितांना न्यायासाठी संघर्ष अटळ असला तरी

लढलो तर जिंकू शकतो,' हा तरुण पिढीचा आत्मविश्वास संशोधकांच्या या विजयातून दुणावेल, यात शंका नाही.

दलित विद्यार्थ्यांच्या जागा विकून टाकण्याचा डाव

व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. ते मिळण्यात होणाऱ्या विलंबामुळे त्यासाठी सहा महिन्यांची मुदत ' ईबीसी ' विद्यार्थ्यांना देण्यात आली आहे. तशी मुदत अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांनाही मिळावी, यासाठी पुण्यात दलित संघटनांनी आंदोलन केले. पण त्या आंदोलनानंतर राज्य सरकारने एक जीआर काढून ती मुदत ओबीसी विद्यार्थ्यांनाही लागू केली. पण अनुसूचित जाती, जमातींच्या विद्यार्थ्यांना मात्र त्यातून वगळण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या हाती असलेल्या खात्याच्या या भेदभावाला ' सामाजिक न्याय ' कोण म्हणेल? एकनाथ शिंदे यांनी तातडीने व्यक्तिशः लक्ष घालून एससी, एसटी विद्यार्थ्यांवरील याही अन्यायाचे निवारण करण्याची गरज आहे. अन्यथा, त्या विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारून त्यांच्या रिक्त राहणाऱ्या जागा विकून मालामाल होण्याचे संस्थाचालकांचे मनसुबे सफल होण्यास नोकरशाहीप्रमाणे मुख्यमंत्र्यांचाही वरदहस्त आहे, हे जगजाहीर होवून जाईल.

**दिवाकर शेजवळ**
**ज्येष्ठ पत्रकार**

## निवडणूक आयोग संपर्कप्रमुख म्हणून काम करण्यास नकार

**मुंबई:** लोकसभा निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्याने पक्षावर नाराज असलेल्या किरीट सोमैय्या यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत पक्षाचे निवडणूक आयोग संपर्कप्रमुख म्हणून काम करण्यास नकार दिला आहे. त्याचप्रमाणे आधी विचारणा न करता परस्पर या पदावर नियुक्ती जाहीर केल्याबद्दल नाराजी व्यक्त करत आपल्याच पक्षातील प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रावसाहेब दानवे यांना घरचा आहेर दिला आहे.

सन २०१४ मध्ये सोमैय्या यांनी ईशान्य मुंबई मतदार संघातून लोकसभेत प्रतिनिधित्व केले होते. त्यानंतर झालेल्या सन २०१९ च्या निवडणुकीत शिवसेनेच्या विरोधामुळे त्यांना तिकीट नाकारण्यात आले. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गट महाविकास आघाडीत सहभागी झाल्यामुळे आपल्याला उमेदवारी मिळेल, अशी सोमैय्या यांची अपेक्षा होती. मात्र, पक्षाकडून त्यांना डावलून मिहीर कोटेचा यांना उमेदवारी दिली. त्यामुळे सोमैय्या हे पक्षावर नाराज आहेत.

आपण पक्षाचे निवडणूक आयोग संपर्कप्रमुख म्हणून माझी नियुक्ती केल्याची परस्पर घोषणा केली. याबाबत माझ्याकडे विचारणा केली नाही किंवा पूर्वकल्पना दिली नाही. ही पद्धत योग्य नाही. या पदासाठी नियुक्ती केल्याने मी पक्षाचे आभार मानतो. मात्र, ही जबाबदारी स्वीकारण्याची माझी तयारी नाही, या पुढील काळात विचारणा न करता अथवा पूर्वकल्पना न देता परस्पर नियुक्ती करून अवमानास्पद वागणूक दिली जाऊ नये, अशा आशयाचे पत्र सोमैय्या यांनी विधानसभा निवडणुकीची जबाबदारी असलेले रावसाहेब दानवे यांना पाठवले आहे. त्याची प्रत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनाही पाठवली आहे. सन २०१९ पासून आपण पक्षाचा सामान्य सदस्य म्हणून काम करत असून सामान्य सदस्य म्हणूनच आपल्याला काम करू द्यावे, अशी विनंती ही त्यांनी केली आहे.

## मणिपूर शांत करा अथवा राजीनामा द्या: संजय राऊत यांची मागणी

**मुंबई :** मणिपूर हा देशाच्या काळजाचा तुकडा आहे. तिथली परिस्थिती काश्मीरपेक्षा वाईट आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया, युक्रेनचे युद्ध थांबविण्याचे प्रयत्न करण्यापूर्वी मणिपूरला जावे. तिथे शांतता प्रस्थापित करावी. अथवा अपयश पत्करून पंतप्रधान मोदी यांनी गृहमंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

मणिपूर दीड वर्षापेक्षा अधिक काळ पेटलेले आहे. तिथे गोळीबार, बॉम्ब हल्ले होत आहेत. रॉकेट आणि ड्रोन हल्ले होत आहेत. महिलांवर अत्याचार होत आहेत. रशिया आणि युक्रेन यांचे युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी किंवा गृहमंत्री अमित शहा यांना मणिपूरकडे लक्ष देण्यास वेळ नाही. रशिया आणि युक्रेनचा दौरा करणाऱ्या पंतप्रधानांना मणिपूर ला भेट द्यायला वेळ नाही, असा आरोप राऊत यांनी केला.

गृहमंत्री अमित शहा मुंबईला येतात. राजकीय बैठका घेतात. मात्र, त्यांनाही मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात रस नाही, अशी टीका करून राऊत म्हणाले की, मणिपूरचा दोष माथी मारायला आता पंडित नेहरू नाहीत. अकरा वर्षे सत्ता तुमची आहे. मणिपूर शांत करण्याची जबाबदारी तुमची आहे. मणिपूर हातातून घालवायचा आहे का, असा सवालही त्यांनी केला.

## इलेक्ट्रिक वाहने लवकरच सर्वसामान्यांच्या आवाक्यात : नितीन गडकरी



**नवी दिल्ली :** वजेवर चालणाऱ्या दुचाकी वाहनांच्या किमती कमी झाल्या असल्या तरीही चार चाकी वाहनांच्या किमती अद्याप अधिक आहेत. मात्र, आगामी दोन वर्षात उपलब्धता वाढल्याने चार चाकी वाहनांच्या किमतीही सर्वसामान्यांच्या आवाक्यात येतील. त्यामुळे देशातील वाहन व्यवसायात मोठे फेरबदल अनुभवाला येतील, असे प्रतिपादन केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

दि ऑटोमोटिव्ह कंपोनंट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या ६४ व्या वार्षिक सभेत गडकरी बोलत होते.

विजेवर चालणाऱ्या दुचाकी वाहनांच्या सुट्ट्या भागांची आणि खुद्द इंजिनची निर्मिती भारतात होऊ लागली आहे. त्यामुळे देशात विजेवरील दुचाकी निर्मितीला वेग आला आहे. अर्थातच विजय वरील दुचाकींच्या किमती कमी झाल्या आहेत. मात्र, विजेवर चालणाऱ्या चार चाकी वाहनांचे सुट्टे भाग अद्याप आयात करावे लागत आहेत. ही परिस्थिती दोन वर्षात निश्चितपणे बदलेल आणि देशात विजेवर चालणाऱ्या चार चाकी वाहनांचे सुट्टे भाग तयार होऊ लागतील. अर्थातच उपलब्धता वाढल्याने विजेवर चालणाऱ्या चार चाकी वाहनांच्या किमती पेट्रोल आणि डिझेलच्या वाहनांच्या बरोबरीने येऊन पोहोचतील, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाने आणि अवजड उद्योग मंत्रालयाने विजेवरील चार चाकी वाहनांवर अनुदान देण्यास आपली कोणतीही हरकत नाही. दोन्ही मंत्रालयांच्या समन्वयाने हा निर्णय होऊ शकतो. मात्र, मुळात विजेवर चालणारे वाहन हे इंधनाच्या बाबतीत बचत करणारे आहे. विजेवरील वाहने आणि त्यांचे सुटे भाग याचे उत्पादन भारतात वाढू लागले आहे. त्यामुळे अनुदान न देता ही विजेवर चालणाऱ्या चार चाकी वाहनांच्या किमती आटोक्यात ठेवण्यास यश मिळू शकते, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.







ज्येष्ठा आणि कनिष्ठा गौरींचे उत्साहात आगमन.

# बंडाचे निशाण

**हरियाणात दहा वर्षांपासून भाजपची सत्ता आहे. भाजपचा मित्रपक्षाने अगोदरच त्याची साथ सोडली आहे. काँग्रेसमध्ये गटबाजी प्रचंड असली, तरी या वेळच्या तिकिट वाटपानंतर नाराजी व्यक्त झाली असली, तरी ती मर्यादित आहे. काँग्रेस आणि आम आदमी पक्षाची युती व्हावी, असा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा प्रयत्न होता; परंतु 'आप'च्या आमदारांची काँग्रेसविषयीची वादग्रस्त वक्तव्ये आणि काँग्रेसमध्ये त्यामुळे निर्माण झालेली नाराजी या पार्श्वभूमीवर 'इंडिया'आघाडी तिथे तुटेल असे सध्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर भाजपसाठी चांगली संधी होती; परंतु ती गमावल्यात जमा आहे. मनोहरलाल खट्टर यांना दिल्लीत नेऊन मंत्री केले.**

ओबीसी नायब सिंग सैनी यांना मुख्यमंत्रिपद देऊनही लोकसभा निवडणुकीत भाजपला फार काही फायदा झाला नाही. उलट तोटाच झाला. या पार्श्वभूमीवर भाजपने उमेदवारी वाटपात समतोल साधायला हवा होता; परंतु उमेदवार यादीनंतर राजीनाम्याचे जे नाट्य रंगले, ते अजूनही थांबायला तयार नाही. किमान पाऊणशे नेत्यांनी राजीनामे दिले. म्हणजे फक्त १५ विधानसभा मतदारसंघात नाराजी नाही, असा त्याचा अर्थ होतो. भाजपलाही एवढे मोठे बंड होईल, हे अपेक्षित नव्हते. ६७ उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर भाजपमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. जवळपास सर्वच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने तिकीट वाटपावरून पक्षांमध्ये बंडखोरी होत आहे. या प्रकारामुळे भाजप आणि काँग्रेस या दोघांनाही बंडखोरीचा सामना करावा लागत आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्येही तिकीट वाटपाबाबत भाजपला मोठ्या प्रमाणावर बंडखोरीचा सामना करावा लागला; परंतु तिथे तेवढा फरक पडला नाही; पण हरियाणात भाजपसमोरची स्थिती मध्य प्रदेश किंवा राजस्थानसारखी नाही. दुसरे म्हणजे, हरियाणात अशा छोट्या विधानसभा आहेत, जिथे छोट्या कार्यकर्त्यांच्या बंडाचा थेट परिणाम विजय-पराजयावर होतो. या दृष्टिकोनातून पाहता भाजपसाठी हा मोठा धक्का आहे; मात्र ज्यांनी बंडखोरी केली, त्यांची पार्श्वभूमी पाहिल्यावर असे दिसते, की सध्या भाजपसमोर असे कोणतेही संकट नाही ज्यावर पक्ष मात करू शकत नाही. भाजपमध्ये बंडखोरी करणाऱ्या नेत्यांमुळे किमान किमान दोन डझन जागांवर भाजपला फटका बसू शकतो. कारण तिथे प्रभावशाली नेत्यांनी राजीनामे दिले आहेत. अगोदरच भाजपवर तिथला शेतकरी नाराज आहे. अग्नीवीर योजनेमुळे तरुण नाराज आहेत. कुस्तीपटू गेल्या वर्षापासून नाराज आहेत. नाही म्हटले, तरी त्यांच्या आंदोलनाचा आणि विनेश फोगट व बजरंग पुनिया यांच्या काँग्रेस प्रवेशाने भाजपची अडचण झाली आहे. त्यातच कुस्तीगीर परिषदेचे माजी अध्यक्ष, भाजपचे नेते ब्रीजभूषण सिंह ज्या पद्धतीने विनेश आणि पुनिया यांच्याविरोधात गरळ ओकत आहेत, त्याचा आपसूक फायदा काँग्रेसला होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तर भाजपने आता त्यांना तोंड बंद ठेवण्याची समज दिली आहे.

माजी मुख्यमंत्री आणि 'इंडियन लोकदला'चे प्रमुख ओमप्रकाश चौटाला यांचे भाऊ रणजीत सिंह यांनी पाच वर्षे अपक्ष आमदार म्हणून सरकारमध्ये मंत्रिपदाचा उपभोग घेतला आहे. ऐन यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता; पण लोकसभा निवडणूक जिंकता आली नाही. काँग्रेसचे उमेदवार जयप्रकाश यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. आता मी पक्षाच्या तिकिटासाठी भीक मागणार नाही आणि रानिया विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढणार असल्याचे त्यांनी सांगितले. रणजीत चौटाला २०१९ मध्ये रानियामधून अपक्ष आमदार म्हणून विजयी झाले होते आणि नंतर त्यांनी भाजप सरकारला पाठिंबा दिला होता. चौटाला म्हणतात, की मला दिल्लीतून फोन आला होता, त्यात पक्षाच्या नेत्यांनी मला डबवली विधानसभेची जागा देऊ केली होती; पण मी फक्त रानियामधूनच निवडणूक लढवणार आहे. या वेळी रानियाची जागा त्यांच्यासाठी सोपी नाही. कारण येथे चौटाला कुटुंबातील आजोबा आणि नातू एकमेकांना भिडणार आहेत. 'इंडियन नॅशनल लोक दला'ने पक्षाचे ज्येष्ठ नेते अभय चौटाला यांचे पुत्र अर्जुन चौटाला यांना रानिया मतदारसंघातून उमेदवार म्हणून घोषित केले आहे. अर्जुन पहिल्यांदाच विधानसभा निवडणूक लढवणार आहे; मात्र हरियाणाचे राजकारण समजणाऱ्या लोकांचे म्हणणे आहे, की या वेळी रानियाची जागा रणजीत चौटाला यांना वाचवणे कठीण आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत ते रानिया मतदारसंघातून विजयी झाले होते. याआधी रानिया मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर रणजीत यांना दोनदा पराभवाला सामोरे जावे लागले होते. २००९ मध्ये नवीन परिसीमनानंतर रणजीत यांनी रानिया विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली. कृष्णा कंबोज यांच्याकडून त्यांचा पराभव झाला. २०१४ मध्ये रामचंद्र कंबोज यांच्याकडून निवडणूक हरले होते. त्यामुळे रणजीत चौटाला यांच्यासाठी रानिया ही सुरक्षित जागा आहे, असे म्हणणे चुकीचे ठरेल. आता कुंबोज यांना भाजपने उमेदवारी दिली नाही. सावित्री जिंदालचे प्रकरण वेगळे आहे. लोकसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी काँग्रेसमधून भाजपमध्ये दाखल झालेल्या जिंदाल कुटुंबाची हरियाणातील अनेक जागांवर मजबूत पकड आहे. त्यामुळेच कठीण परिस्थितीतही नवीन जिंदाल यांनी कुरुक्षेत्रातून भाजपच्या तिकिटावर निवडणूक जिंकली; मात्र भाजपचे कुरुक्षेत्र खासदार नवीन जिंदाल यांच्या आई सावित्री जिंदाल याही तिकीट वाटपावरून नाराज आहेत. पक्षाचे अधिकृत उमेदवार आणि आरोग्य मंत्री कमल गुप्ता यांच्या विरोधात हिसारमधून निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. गुप्ता यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पाठिंबा आहे; मात्र त्या भाजपच्या सदस्य नाहीत. सावित्री जिंदाल यांनी हिसारमधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवून कमल गुप्ता यांचा पराभव करावा अशी भाजपच्या काही बड्या नेत्यांची इच्छा आहे. जिंदाल म्हणतात, की हिसारचे लोक माझे कुटुंब आहेत, मला निवडणूक लढवण्याची विनंती करत आहेत. त्यांनी माझा इतका आदर केला, तर मला त्यांच्या निर्णयाचा आदर करावा लागेल. एकदा मी काही बोलले, की मी मागे हटत नाही. काँग्रेसमध्ये परतण्याची शक्यता आहे का, असे विचारले असता जिंदाल म्हणाले, की वेळच सांगेल. भूपेंद्र सिंग हुड्डा यांच्याशी आमचे चांगले संबंध असून मी त्यांच्याकडूनच राजकारण शिकलो आहे, असेही जिंदाल म्हणाले. तो माझ्या मोठ्या भावासारखा आहे. राजकारणात प्रवेश केला तेव्हा मला फारशी माहिती नव्हती. त्याच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले. सावित्री जिंदाल हिसारमधून निवडणूक लढवल्यास भाजपचे नुकसान नक्की आहे. जिंदाल यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यास ते आणखी काही जागांवर प्रभाव टाकू शकतात.

तिकीट न मिळाल्याने संतप्त झालेले रतियाचे आमदार लक्ष्मण नापा यांनी तात्काळ पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व सोडणार असल्याचे जाहीर केले आहे. काँग्रेसने तिकीट दिले नसले, तरी काँग्रेसला विजयी करण्यासाठी मी काम करेन, असे ते म्हणाले. भाजपने सिरसाच्या माजी खासदार सुनीता दुग्गल यांना रतिया या जागेवरून उमेदवारी दिली आहे. पक्षाने केलेल्या प्रत्येक सर्वे क्षणात मी विजयी होत असल्याचे नापा सांगतात. मला ८०-९० सरपंचांचाही पाठिंबा आहे. ज्यांनी पक्षाला माझ्या पाठिशी असल्याचे लेखीही दिले, तरीही पक्षाने मला निवडणूक लढवण्यासाठी तिकीट दिले नाही. हे माझ्यासाठी खूप धक्कादायक आणि निराशाजनक आहे. मी मुख्यमंत्री सैनी आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष मोहनलाल बडोली यांच्याशी बोललो आणि त्यांना माझ्यामध्ये काही कमतरता दिसली का, असे विचारले. जेव्हा पक्षाने माझ्यासारख्या कार्यकर्त्याचा विचार केला नाही, तेव्हा मला भाजपमध्ये राहण्याचे कोणतेही कारण नव्हते.

भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री करणदेव कंबोज यांनी नापा यांच्याप्रमाणे पक्ष सोडला आहे. ते भाजपसाठी किती महत्त्वाचे आहेत, हे यावरून समजू शकते, की मुख्यमंत्री नायब सैनी स्वत: त्यांची समजूत घालण्यासाठी त्यांच्या गावी पोहोचले; पण कंबोज यांची नाराजी इतकी होती, की त्यांनी मुख्यमंत्र्यांशी हस्तांदोलन करणेही योग्य मानले नाही. मुख्यमंत्र्यांनी हात पुढे केल्यावर कंबोज यांनी त्यांना अभिवादन केले. कर्नाल जिल्ह्यातील उंद्री मतदारसंघात कंबोजकडे दुर्लक्ष झाले. भाजपने विद्यमान आमदार रामकुमार कश्यप यांना उमेदवारी दिली आहे. आपल्या राजीनामा पत्रात कंबोज यांनी भाजप नेतृत्वावर निशाणा साधला आणि पक्ष समर्पित कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करून नवोदितांना प्राधान्य देत असल्याचा आरोप केला. तिकीट वाटपानंतर पक्षांमध्ये बंडखोरी काही नवीन नाही. गुजरात विधानसभा निवडणुकीतही भाजपच्या बाजूने वारे वाहत असतानाही तिकीट न मिळालेल्या आमदारांनी बंडखोरी केली; मात्र हरियाणात भाजपमध्ये ज्या प्रकारची बंडखोरी पाहायला मिळत आहे, तो राज्यात पक्ष कमकुवत झाल्याचा पुरावा आहे. भाजप सरकारमध्ये परत येण्याची शक्यता नाही, असे लोकांना वाटते. राज्यात भाजपची लोकप्रियता शिगेला पोहोचली आहे, असे बंडखोर नेत्यांना मानले असते, तर त्यांनी किमान विधाने केली नसती. राज्यात पक्षाची स्थिती भक्कम असताना अपक्ष म्हणून निवडणूक लढवणारेही तिकीट न मिळाल्याने नेतृत्वावर टीका करत नाहीत कारण निवडणुका जिंकूनही सरकार स्थापन झाल्यास पुनरागमन होण्याची शक्यता त्यांना आहे. सध्या ज्या प्रकारे माजी मंत्री, माजी आमदार आणि इतर नेते तिकिटापासून वंचित राहिल्याने रडत आहेत, त्यावरून काही दिवसांनी हे सर्व बंडखोर भाजपकडे वळतील, असे दिसते आहे.

# कृष्णा - कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या ; कराड सभासदांना १० टक्के लाभांश देणार : बाळासो पाटील

**कराड :** कृष्णा - कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या ; कराड , या संस्थेची मार्च २०२४ अखेर रु .१८८ कोटी ६० लाखाची व्यवसायपूर्ती झालेली असून सभासदांना १० टक्के लाभांश देणार : - बाळासो पाटील चेअरमन सातारा जिल्हा कार्यक्षेत्र असणारी आणि विविध पुरस्कारने गौरवलेल्या कृष्णा कोयना नागरी सहकारी पतसंस्था मर्या , कराड या संस्थेची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शताब्दी सभागृह दि कराड अर्बन को - ऑप बँक लि . , कराड मुख्यकार्यालय शनिवार पेठ , कराड येथे रविवार दि . २५.०८.२०२४ रोजी खेळीमेळीत संपन्न झाली . यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेत चेअरमन बाळासो पाटील बोलत होते . यावेळी व्हा . चेअरमन श्री सचिन चव्हाण , महाव्यवस्थापक अरुण पाटील ( आप्पा ) , संचालक



आनंदराव पाटील , सुरेश शिंदे , अभय धोपटे , दत्तात्रय कलबुर्गी , प्रकाश पाटील , सुभाष काळे , प्रशांत पाटील , यशवंत ढेबे , महेश कांबळे , रोहिणी लाखोले , स्वेता पाटील व वैधानिक लेखापरीक्षण के.एल. सावंत उपस्थित होते . प्रारंभी सभेचे नोटिस वाचन संस्थेचे महाव्यवस्थापक अरुण पाटील यांनी केले . त्यानंतर विषय पत्रिकेवरील प्रत्येक विषयाप्रमाणे सभासदांनी विषयानुसार एकमताने मंजूरी देणेत आली . संस्थेचे चेअरमन बाळासो पाटील म्हणाले संस्थेचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हा असून कराड आणि पाटण तालुक्यात संस्थेच्या ९ शाखा व मुख्य कार्यालय कार्यरत आहे . संस्थेस सन करून निव्वळ नफा रु १ कोटी ३२ लाख इतका झालेला आहे . २०२३-२४ या आर्थिक वर्षात आवश्यक त्या तरतुदी तरी संस्थेने सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर केलेला आहे . तसेच संस्थेचा एकत्रित व्यवसाय रू . १८८ कोटी ६० लाखाचा झालेला आहे . संस्थेच्या मार्च २०२४ अखेर एकूण ठेवी १०७ कोटी ६२ लाख , एकूण कर्जे रु . ८० कोटी ९८ लाख व गुंतवणूक ४३ कोटी ४९ लाख आहे . खेळते भांडवल रु १२९ कोटी ६२ लाख आहे . एकूण स्वनिधी रु .१६ कोटी ५४ लाख आहे . तसेच संस्थेस सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता ऑडिट वर्ग ' अ ' मिळाला आहे . तसेच चालू आर्थिक वर्षामध्ये एकूण ठेवी १२१ कोटी करणेचे उद्धिष्ट व स्वतःच्या मालकीची जागा अथवा इमारत खरेदी करणेचा मानस आहे . संस्थेच्या शाखा कार्यालयाकरीता संस्थेच्या अद्यावत स्व : मालकीच्या तीन इमारती असून संस्थेचे सर्व शाखाचे कामकाज स्वः मालकीचे डाटा सेंटरद्वारे बैंकिंग प्रणालीमध्ये अद्यावत चालू आहे . तसेच छएत्रद्ध / ठढत्रड व बिल पेमेंट इत्यादी बँकिंग सुविधा सर्व शाखामध्ये उपलब्ध आहेत . संस्थेने योग्य ध्येयधोरण राबविलेमुळे संस्थेची प्रगतीची घोडदौड कायम ठेवलेली आहे व त्याचा व्यवसाय वृद्धीवर फारसा परिणाम होऊ दिलेला नाही . संस्थेच्या प्रगती मध्ये संस्थेचे कुटुंबप्रमुख महाव्यवस्थापक अरुण पाटील ( आप्पा ) १. सर्व संचालक , शाखा सल्लागार , सर्व सभासद , ग्राहक , हितचिंतक , सर्व अधिकारी , शाखा प्रमुख व सेवकवर्ग यांनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे . प्रारंभी संस्थेचे महाव्यवस्थापक अरुण पाटील यांनी सर्व उपस्थित असणार्या , सभासदांचे स्वागत केले . कार्यक्रम पत्रिके प्रमाणे सभेचे कामकाज झालेनंतर संस्थेचे चेअरमन यांचे अध्यक्षीय भाषण झाले सूत्रसंचालन व आभार विजय शिंदे यांनी मानले . यावेळी संस्थेचे सर्व संचालक अधिकारी , शाखा प्रमुख व सर्व सेवक वर्ग उपस्थित होते . , त्यानंतर सभेचे

# टेबल टेनिस स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलला 13 पदके

## ६ सुवर्ण, ४ रौप्य आणि ३ कांस्य पदकांवर नावे कोरली

**पुणे :** बालेवाडी स्टेडियम येथे संपन्न झालेल्या जिल्हा परिषद मुळशी तालुका शालेय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूल ने ६ सुवर्ण, ४ रौप्य तर ३ कांस्य असे एकूण १३ पदके पटकावले. या स्कूलचा विजय त्यांच्या समर्पण, कौशल्य आणि चिकाटीला अधोरित करतो. या स्पर्धेतून शालेय स्तरावरील उत्कृष्ट प्रतिभांचा समावेश आहे. स्कूलचा सुवर्णपदकाचा प्रवास त्यांच्या लढती आणि चुरशीच्या स्पर्धेमुळे झाला. अपवादात्मक तंत्र आणि धोरणात्मक पराक्रमाचे प्रदर्शन करत स्कूल ने या स्पर्धेत उल्लेखनीय संयम आणि दृढनिश्चयाने नेव्हिगेट केले.

ही स्पर्धा १४ व १९ वर्षाखालील मुले व मुलींमध्ये संपन्न झाली. यात १४ वर्षाखालील मुलींमध्ये मोली गुप्ता, मार्दवी अकीवटे, ध्रिती जैन





यांनी सुवर्णपदक मिळविले. १४ वर्षाखालील मुलींच्या फायनलमध्ये धृती जैन ध्रुव ग्लोबल स्कूलची महत्वाची खेळाडू होती आणि तिने २ सामने जिंकले.

तसेच १९ वर्षाखालील मुलींमध्ये काव्या राठोड, निओराह माम, अवंती किर्लो स्कर यांनी सुवर्णपदकावर नाव कोरले. काव्या ही ध्रुव ग्लोबल स्कूलची स्टार खेळाडू होती. तीने एकेरी राऊड जिंकून अंडर १९ फायनलमध्ये विजय निश्चित केले. तीने प्रतिस्पर्धी ११-८, ९-११, ११-७ असा सहज पराभव केला. हिची कामगिरी काही कमी नव्हती. सुरूवातीपासूनच तिने चपळता, अचूकता आणि सामरिक बुद्धिमत्तेचे मिश्रण प्रदर्शित केले ज्यामुळे तिला तिच्या प्रतिस्पर्ध्यापासून वेगळे केले.

तसेच १९ वर्षा खालील मुलांमध्ये अथर्व माम, यश राठी, रिशीत खरे, अग्नीव घोशाल यांना रौप्य पदक मिळाले .१४ वर्षाखालील मुलांमध्ये रियांश अग्रवाल, अर्जुन जैन, स्वरूप घनवट यांना कांस्यपदक मिळाले.

त्यांच्या सादरीकरणाला उत्कृष्ट दाद मिळाली. त्यांच्या यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यश मालपाणी व प्रिन्सीपल संगीता राऊतजी यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्यात.

# वडगावातील प्रशासकीय इमारतीस द ग्रेट मराठा श्रीमंत महादजी शिंदे नाव द्या

**वडगाव मावळ :** मावळ तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडगाव शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीस द ग्रेट मराठा श्रीमंत महादजी शिंदे यांचे नाव देण्याची मागणी वडगाव शहरातील ग्रामस्थांनी केली आहे याबाबत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आह

यावेळी ज्येष्ठ नेते गणेश ढोरे, भास्करराव म्हाळसकर, सुभाषराव जाधव, तुकाराम ढोरे, चंद्रकांत ढोरे, गंगाराम ढोरे, पंढरीनाथ ढोरे, रुपेश म्हाळसकर आदींनी तहसीलदारांना निवेदन दिले. या वेळी पोटोबा देवस्थानचे मुख्य विश्वस्त किरण भिलारे, माजी उपनगराध्यक्षा सायली म्हाळसकर, किरण म्हाळसकर, अतुल राऊत, विशाल वहिले, प्रवीण ढोरे, राजेश बाफना, रवींद्र म्हाळसकर, गणेश ढोरे, बाळासाहेब शिंदे, अनिल ओव्हाळ, अनिस तांबोळी, गणेश



भेगडे, विजय गुरव, तानाजी तोडकर आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे, की वडगाव शहराला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. इंग्रज राजवटीपूर्वी छत्रपती शिवरायांच्या काळातील घटनांची साक्ष देणाऱ्या महत्त्वांच्या वास्तू या गावात आहेत. मराठेशाहीतील मराठा सरदार श्रीमंत महादजी शिंदे व त्यांच्या सैन्याने पहिल्या मराठा विरुध्द इंग्रज युध्दात इंग्रज सेनानी स्टूअर्ट फाकडा याचा सन १७७९ साली वडगावच्या भूमीमध्ये वध करून विजय मिळवला आणि इंग्रजांना माघार घेण्यास भाग पाडले होते. खुल्या मैदानात इंग्रजांना नेस्तनाबूत करणारे हे देशातील एकमेव ठिकाण आहे. या युध्दापासून श्रीमंत सरदार महादजी शिंदे आणि वडगाव मावळचे नाव भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले. पुढे इंग्रज राजवटीत या भागातील सरकारी कामकाजाचे मुख्य दिकाण म्हणून वडगाव मावळ ओळखले जाऊ लागले.

यानंतर न्यायालय, मामलेदा कचेरी, पोलिस ठाणे यासह शासनाच्य अनेक विभागांची कार्याल वडगावमध्ये सुरू झाली. त्यामुळे नवीन प्रशासकीय इमारतीस श्रीमंन महादजी शिंदे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर गुलाबराब म्हाळसकर, अविनाश बवरे, मयूर ढोटे संभाजी म्हाळसकर, चंद्रजीत वाघमारे दीपक बवरे, अरुण वाघमारे, गणेश विनोदे, रमेश म्हाळसकर, वसंत पगडे केवल ओसवाल, राहुल म्हाळसकर रमेश म्हाळसकर, अमोल ठोंबरे विनायक कुलकर्णी, संतोष निघोजकर सुनीत कदम, पवन भंडारी, विनायक लवंगारे अक्षय बेल्हेकर, गणेश झरेकर, मधुकर गुरव, सौरभ दुगमा आदींच्या सह्या आहेत.

# रिपाइला योग्य प्रतिनिधित्व मिळाल्यास महायुतीचा फायदा: रामदास आठवले

**पुणे:** लोकसभा निवडणुकीत एनडीएला अपेक्षित यश मिळाले नसले, तरी आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल, अशी आम्हाला अपेक्षा आहे. जर आम्हाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळाल्यास त्याचा फायदा महायुतीमधील तीनही पक्षांना निश्चित होईल, असा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी व्यक्त केला.

रामदास आठवले यांनी मंगळवार १० सप्टेंबर रोजी पुण्यातील व्हीआयपी विश्रामगृहात एक पत्रकार परिषद घेतली, त्या वेळी ते बोलत होते. या वेळी पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, राज्य संघटक परशुराम वाडेकर, सूर्यकांत वाघमारे, गौतम सोनवणे, शैलेश चव्हाण, अशोक शिरोळे, श्याम सदाफुले, मोहन जगताप, महिपाल



वाघमारे, वसंत बनसोडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.


आठवले पुढे म्हणाले की, सध्या पुण्यात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सव हा सर्व धर्मीयांच्या एकतेचे आज प्रतीक बनला आहे. केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार देशातील नागरिकांच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. मोदी सरकारच्या धोरणांमुळे आज देशातील २५ कोटी लोकांना आम्ही गरीबीच्या बाहेर आणू शकलो. शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून आम्ही १३ हजार कोटी रुपये आजवर दिलेले आहेत. दहा लाख लोकांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये एसी-एसटीच्या उमेदवारांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळालेले आहे.

आठवले यांनी सांगितले की, गेल्या लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित जागा प्राप्त झाल्या नाहीत. संविधान बदलाचा मुद्दा विरोधकांनी जोरदारपणे लावून धरल्यामुळे जनतेत एक वेगळा संदेश गेला. तसेच मराठा आंदोलनाचाही फटका महायुतीला बसला होता. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीत मात्र चित्र उलटे दिसून येईल.

राज्यातील महायुती सरकारने जनतेसाठी अनेक चांगल्या योजना राबवल्या आहेत. लाडकी बहीण योजना ही महायुती सरकारची एक मोठी उपलब्धी आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगल्या जागा मिळतील, असा विश्वास आठवले यांनी व्यक्त केला.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902



# श्री शिव छत्रपती मित्र मंडळाचे १३३ व्या वर्षात पदार्पण

## पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडून उद्घाटन

पुणे : श्री शिव छत्रपती मित्र मंडळाने यंदा १३३ व्या वर्षात पदार्पण केले असून मंडळाने सादर केलेल्या सायबर क्राईमवर आधारित 'अदृश्य चोर' या जिवंत देखाव्याचे उद्घाटन पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले.मंडळाचे अध्यक्ष कान्होजी दयानंद जेधे,बलराज वाडेकर,प्रीतम परदेशी,प्रतीक खोपडे, शरद पतंगे,शशिकांत गवळी ,सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या सायबर क्राईम विषयक बातम्यांची कात्रणेही या जिवंत देखाव्यात मांडण्यात आली आहेत.

'सध्याच्या डिजिटल युगात सायबर गुन्हे वाढत आहेत, त्यामुळे सायबर क्राइमविषयी जागरूकता असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणूनच यंदा गणेशोत्सवानिमित्त श्री शिव छत्रपती मित्र मंडळाने 'अदृश्य चोर ' (सायबर क्राईम वर आधारित जिवंत देखावा) सादर केला आहे. सर्व नागरिकांनी मंडळाला भेट देऊन देखावा एकदा अवश्य पाहावा आणि त्यातून सुरक्षिततेचा बोध घ्यावा',असे आवाहन कान्होजी दयानंद जेधे यांनी केले.पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी मंडळाच्या समाजाभिमुखतेचे आणि कालानुरूप जिवंत देखाव्याचे कौतुक केले.जिवंत देखावा ही परंपरा पुढे सुरु राहिली पाहिजे,आणि त्यातून समाजप्रबोधन,जनजागृती झाली पाहिजे',असे उद्गार अमितेश कुमार यांनी काढले.

जेधे मॅन्शन,गुरुवार पेठ, पंचमुखी मारुती मंदिरजवळ असणाऱ्या या मंडळाला समाजभूषण आप्पासाहेब जेधे व देशभक्त केशवराव जेधे यांचा वारसा आहे. अनेक पुरस्कार या मंडळाला मिळाले आहेत.

# आमदार सुनिल शेळके यांच्या प्रयत्नातून मिळाले जात प्रमाणपत्र

## मागील चार वर्षांपासून आदिम सेवा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी



वडगाव मावळ :- संपुर्ण मावळ तालुक्यात आमदार सुनिल शेळके यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या आदिम सेवा अभियानांतर्गत नाणे मावळातील गोवित्री, वळवंती येथील ५४ कातकरी बांधवांना जात प्रमाणपत्रांचे वाटप (सोमवार दि.९) करण्यात आले.

गोवित्री,वळवंती गावातील कातकरी समाजातील अनेक नागरिकांकडे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंरही जातीचे दाखले उपलब्ध नाहीत.शैक्षणिक कामांसाठी, शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक असते.परंतु या नागरिकांना जात प्रमाणपत्र काढण्याची किचकट प्रक्रियेला सामोरे जावे लागते. योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याने त्रास सहन करावा लागतो. दाखला नसल्याने विविध शासकीय योजनांपासून वंचित रहावे लागते.आजपर्यंत विविध शिबिरे, योजनांच्या नावाखाली केवळ कागदपत्रे जमा केली जातात. परंतु सर्व प्रक्रिया पूर्ण करुन दाखले कोणीही मिळवून देत नव्हते.त्यामुळे आश्वासनांशिवाय या नागरिकांच्या पदरात काहीच पडले नव्हते.

परंतु आमदार शेळके यांनी आदिम सेवा अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत तालुक्यातील प्रत्येक वाडी-वस्तीवर जाऊन नागरिकांच्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेणे व शासन दरबारी सातत्यपूर्ण पाठपुरावा करणे यामुळे या नागरिकांना अखेर जातीचे प्रमाणपत्र घरपोच उपलब्ध झाले.अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर जातीचे दाखले मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी आमदार सुनिल शेळके जनसंपर्क कार्यालयाचे प्रतानिधी सचिन वामन, रुपेश सोनुने, गणेश तळपे,अमोल पवार व ग्रामस्थ उपस्थित होते.

# सोनपावलांनी आली ज्येष्ठा गौरी आगमन

पुणे : ज्येष्ठा गौरी-अखंड सौभाग्यप्राप्तीसाठीचे व्रत!

घरोघरी आगमनाची जय्यत तयारी पुजन

श्रावण भाद्रपद मासात येणाऱ्या गौरींचे पूजन करून अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. भाद्रपद शुद्ध सप्तमी या दिवशी अनुराधा नक्षत्रावर आपापल्या कुळाचाराप्रमाणे गौरीचे आवाहन करतात. त्यानंतर दुसऱ्या दिवशी अष्टमीला; याला दुर्गाष्टमी असेही म्हणतात ज्येष्ठा नक्षत्रावर गौरीची पूजा करून महानैवेद्य दाखवितात. तसेच तिसऱ्या दिवशी म्हणजेच नवमीला मूळ नक्षत्रावर गौरींचे विसर्जन करण्यात येते. या सणाविषयी भाविक नागरिकांमध्ये विशेषतः महिला वर्गात विशेष महत्त्व आणि श्रध्दा आहे. त्यामुळे गणेशोत्सवासोबतच



महालक्ष्मींच्या आगमनाची प्रतीक्षा सुरू होती आणि जय्यत तयारीसुध्दा झाली आहे. मंगळवार (दि.१०) महालक्ष्मींचे आगमन झाले आहे.

पुराणात सांगितल्याप्रमाणे असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मीगौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय्य करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुद्ध अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना आणि पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले; म्हणून अखंड सौभाग्य प्राप्त होण्यासाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरी हे व्रत करतात. माहेरवाशीण म्हणून पूजली जाणारी गौर ही अनेक ठिकाणी गणपतीची आई म्हणून पूजतात, तर अनेक ठिकाणी ज्येष्ठा-कनिष्ठा अशा बहिणींच्या स्वरूपात पूजल्या जातात. व्रत करण्याची पद्धत आपआपल्या कुळाचारानुसार व परंपरेनुसार वेगवेगळ्या आहेत. मात्र, उद्देश, श्रध्दा, भक्ती आणि विश्वास सारखाच आहे. हे व्रत तीन दिवस चालते. प्रांतभेदानुसार हे व्रत करण्याच्या विविध पद्धती आहेत. यामध्ये धातूची, मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्रीमहालक्ष्मीचे चित्र काढून, तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे

विदर्भात मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र असतो १६ भाज्यांचा नैवेद्य गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात.



# दलित पँथरच्या अध्यक्षपदी डॉ. स्वप्रिल ढसाळ

मुंबई : दलित पँथर या संघटनेची पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी १९७२ साली स्थापन केली होती. त्यांच्या दुर्दैवी दुःखद निधनानंतर त्यांच्या पत्नी मल्लिका यांच्याकडे संघटनेची जबाबदारी होती. त्यांनी आता त्यांच्या आजारपणामुळे संघटनेची अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांचे पुतणे डॉ. स्वप्नील ढसाळ यांच्याकडे त्यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

नवनिर्वाचित युवा अध्यक्ष डॉक्टर स्वप्रिल ढसाळ हे नामदेव ढसाळ यांचे पुतणे आहेतच पण नामदेवची ध्येयधोरण ही त्यांना माहित आहेत आणि आमची नवी फळी नव्या जोमाने पुन्हा मैदानात उत्तरत आहे .

रोजगार योजना, महीला अत्याचार, उद्योग, जेष्ठ नागरिक, तरुण, शेतकरी असे सर्व घटक आज दुर्लक्षित आहेत. त्यांच्याकडे संघटना नव्या जोमाने सामोरे जाऊन लढा देणार आहे असे डॉ. स्वप्रिल ढसाळ यांनी सांगितले.

# इंदोरीच्या रिंग रोड बाधित संपादित जमिनीसाठी मिळणार दीडपट मोबदला

**पिंपरी चिंचवड :** पिंपरी चिंचवड, १०रोजी संपादित हंगामी बागायती जमिनीसाठी दीडपट परतावा मिळवून दिल्याबद्दल मावळ तालुक्यातील इंदोरी गावातल्या रिंगरोड बाधित शेतकरी बांधवांनी आज खासदार श्रीरंग बारणे यांची भेट घेऊन त्यांना विशेष धन्यवाद दिले.



खासदार बारणे यांनी गेल्या महिन्यात शेतकऱ्यांसमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. यावेळी रिंग रोड बाधित समस्त शेतकऱ्यांना दीड पट परतावा मिळावा अशी मागणी करणारे निवेदन दिले होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी ताबडतोब ती मागणी मान्य करून त्यानुसार आदेश काढण्याच्या सूचना महसूल विभागास दिल्या होत्या. त्यानुसार महसूल विभागाने दीडपट परताव्याबाबत आदेश जारी केला आहे.

संपादित जमिनीच्या दीडपट परताव्याची मागणी मंजूर झाल्याने इंदोरीतील ग्रामस्थांनी व शेतकरी बांधवांनी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष प्रशांत ढोरे यांच्या नेवृत्वाखाली खासदार बारणे यांची भेट घेऊन आभार मानले. बारणे यांना मिठाई भरवून त्यांचा सत्कार केला. आकुर्डी व नाणोली तर्फे चाकण व सुदवडी या लगतच्या गावांप्रमाणेच इंदोरीतील रिंग रोड बाधित शेतकऱ्यांनाही हंगामी बागायत जमिनीला जिरायती जमिनीच्या दीडपट परतावा तर बागायत जमिनीला दुप्पट परतावा मिळावा तसेच संमतीसाठी शेतकऱ्यांना दिलेली ३१ जुलै २०२४ ची मुदत वाढवून मिळावी, अशी मागणी करणारे निवेदन खासदार बारणे यांनी मुख्यमंत्र्यांना दिले व राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून शेतर्क्यांना न्याय मिळवून दिला.

इंदोरीच्या शेतकऱ्यांची मागणी मान्य करून त्यांना न्याय मिळवून दिल्याबद्दल खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले.

## ट्रक - मोटार अपघातात ३ तरुण ठार; चौघे जखमी

**कोल्हापूर :** देवगड -कर्नाटकातील निपाणी या राज्य महामार्गावर सरवडे येथे ट्रक आणि मोटारची मध्यरात्री धडक झाली. या अपघातात राधानगरी तालुक्यातील सोळंकुर गावातील तीन युवक ठार झाले तर चौघेजण जखमी झाले. यामुळे सोळंकुर गावावर शोककळा पसरली आहे. शुभम चंद्रकांत धावरे, आकाश आनंदा परीट, रोहन संभाजी लोहार अशी मृत तरुणांची नावे आहेत. तर , ऋत्विक राजेंद्र पाटील, सौरभ सुरेश तेली, भरत धनाजी पाटील, संभाजी हणमंत लोहार हे जखमी झाले आहेत.

# घरोघरी गौरायांचे पारंपारिक उत्साहात आगमन

पुणे : घरोघरी आज,मंगळवारी दुपारी महिलांनी गौरायांचे थाटात, परंपरा राखत आवाहन,आगमन साजरे केले. गौरी आवाहनाच्या पहिल्या दिवशी अंगणातील तुळशीपासून घरात गौरायांचे आगमन होते.गौरींची पूजा केली जाते.गौरींची पूजा-आरती करून केलेल्या फुलोरा आणि फराळाचा नैवेद्य दाखवला जातो. सर्वांना धन, धान्य, ऐश्वर्य, आरोग्य मिळो अशी प्रार्थना आगमनानंतर महिलांनी गौरीकडे केली.



अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी,धन,धान्य,ऐश्वर्य,आरोग्याची प्रार्थना करण्यासाठी स्त्रिया भाद्रपद महिन्याच्या शुद्ध पक्षात गौरींचे पूजन करतात.गौरी किंवा महालक्ष्मीचे पूजन ज्येष्ठ नक्षत्रावर केले जाते, म्हणून यांना ज्येष्ठागौरी असेही संबोधले जाते.

पहिला दिवस गौरी आवाहनाचा असतो. माहेरवाशिणींना हा मान दिला जातो. आपापल्या पद्धत आणि परंपरेप्रमाणे घरातील प्रवेशद्वारापासून ते गौरी स्थापन करण्याच्या जागेपर्यंत रांगोळीने लक्ष्मीच्या पावलांचे ठसे काढले जातात. हातात गौरी घेऊन आलेल्या बाईचे पाय दुधाने व पाण्याने धुवून आणि त्यावर कुंकवाचे स्वस्तिक काढले जातात. आता येताना लक्ष्मीच्या पायांचे ठसे उमटवत उमटवत गौरींचे मुखवटे आणले . गौरी आगमन करत असताना ताट चमच्याने किंवा घंटेने वाजत गाजत गौरीचे स्वागत केले जाते. गौरीची स्थापना करण्यापूर्वी त्यांना घरातील समृद्धी, दूध-दुभत्याची जागा अशा गोष्टी दाखवल्या जातात. आशीर्वाद मिळून ऐश्वर्य नांदो, अशी प्रार्थना केली जाते. अशा या प्रथेला गौरी आवाहन करणे, असे संबोधतात.

गौरी पूजन बुधवार ११ सप्टेंबर २०२४ रोजी आहे. हा दुसरा दिवस गौरी पूजनाचा असतो. दुपारी गौरीला नैवेद्य दाखवला जाणार आहे. जेष्ठा गौरी पूजन नेहमी जेष्ठा या बुधाच्या नक्षत्रावरच केले जाते, बुधवार दिनांक ११ सप्टेंबर ला जेष्ठा रात्री ९ वाजून २२ मिनिटापर्यंतच आहे रात्री व अष्टमी तिथी रात्री ११ वाजून ४७ मिनिटां पर्यंत आहे त्यामुळे जेष्ठा गौरी प्राणप्रतिष्ठा तसेच पूजन व महा नैवेद्य रात्री ९ वाजून २२ मिनिटांपर्यंत करावा.

गौरी विसर्जन नेहमी मूळ नक्षत्रावर असते गुरुवार दिनांक १२ सप्टेंबर या दिवशी सकाळ पासून ते रात्री ९ वाजून ५३ मिनिटांपर्यंत गौरी विसर्जीत कराव्या ,असे जाणकारांनी सांगितले.

# स्वामी विवेकानंद स्मृती दिनाचे आयोजन

**मुंबई :** स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेत शिकागो मध्ये जे ऐतिहासिक भाषण केले त्याला १३१ वर्ष झाली. या पार्श्वभूमीवर स्वातंत्रवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक मुंबई येथे राष्ट्रकवी रामधारी सिंह दिनकर स्मृती न्यास संस्थेने राष्ट्रप्रेम उत्सव चे आयोजन केले असल्याची माहिती न्यास चे अध्यक्ष नीरज कुमार यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

११ सप्टेंबर रोजी होत असलेल्या या राष्ट्रप्रेम उत्सवामध्ये युवकांच्या भविष्यावर परिसंवाद, स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे चित्र प्रदर्शन, देव धर्म या पेक्षा देश मोठा आहे या विषयावर भव्य नाटक, राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी पत्रकार परिषदेस केंद्रीय राज्यमंत्री अश्विनी कुमार चौबे, मनजीत सिंग,कुमार सुशांत, रोशन सिंग उपस्थित होते.

# ऊस उत्पादकांच्या उपोषणामुळे काँग्रेस नेते म्हेत्रेंच्या अडचणीत वाढ

**सोलापूर :** अक्कलकोट तालुक्यातील काँग्रेसचे नेते, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या मातोश्री साखर कारखान्याने थकविलेली ऊस देयकांची रक्कम मिळण्यासाठी शेजारच्या धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सोलापुरात थेट काँग्रेस भवनासमोर चालविलेल्या आमरण उपोषणाचा मंगळवारी सातवा दिवस होता. या उपोषणाची कोंडी अद्यापि सुटली नाही. मात्र हे आंदोलन आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सुरू असल्याने म्हेत्रे हे राजकीयदृष्ट्या अडचणीत येण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, प्रलंबित ऊस देयकांच्या रकमा लवकरच अदा करण्याचे आश्वासन म्हेत्रे यांनी दिले आहे. मात्र या आंदोलनामागे राजकारण शिजत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. विशेषतः आगामी विधानसभा निवडणुकीत आपणास अडचणीत आणण्यासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पुढे करून हे आंदोलन घडविण्यात आले आहे. त्यामागे कोणाचा हात आहे, हे आपण लवकरच नावानिशी जाहीर करणार असल्याचेही म्हेत्रे यांनी सांगितले. अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे काही वर्षांपूर्वी म्हेत्रे कुटुंबीयांनी मातोश्री साखर कारखाना उभारला होता. अलीकडे हा कारखाना आर्थिकदृष्ट्या अडचणीत असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊस देयकांच्या रकमा गेल्या आठ महिन्यांपासून थकीत आहेत. शेजारच्या धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर, उमरगा आदी भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उसाच्या देय रकमा थकीत आहेत.

# कान्हे उपजिल्हा रुग्णालयाचे लवकरच लोकार्पण : आमदार सुनिल शेळके

## कान्हे उपजिल्हा रुग्णालयाच्या कामाची आमदार सुनिल शेळके यांच्याकडून पाहणी

**वडगाव मावळ, -** कान्हे उपजिल्हा रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या कामाची पाहणी आमदार सुनिल शेळके यांनी केली. रुग्णालयातील कामे अंतिम टप्प्यात असून ती लवकर पूर्ण करण्याच्या सूचना आमदार शेळके यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. रुग्णालयाचे लोकार्पण लवकरच केले जाणार असल्याची माहिती आमदार सुनील शेळके यांनी दिली.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक एम पल्ली, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मिलींद बारभाई, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता धनराज दराडे, वैद्यकीय अधीक्षक वर्षा पाटील, शाखा अभियंता नंदकुमार खोत व इतर अधिकारी उपस्थित होते.

कान्हे उपजिल्हा रुग्णालयाचे काम बर्यापैकी पूर्ण झाले आहे. काही किरकोळ कामे अंतिम टप्प्यात आहेत. रुग्णालयातील सोयी सुविधा, विविध विभागातील वैद्यकीय सामग्री ही कामे त्वरित पूर्ण करावीत. ट्रॉमा केअर सेंटरमध्येही आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा कराव्यात, तसेच अधिक निधीची आवश्यकता भासल्यास तांत्रिक कार्यवाही पूर्ण करुन उर्वरित कामांना गती देण्याबाबतच्या सूचना आमदार शेळके यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

कान्हे येथील ग्रामीण रुग्णालय अद्ययावत व्हावे ही तालुकावासीयांची अनेक वर्षांपासून इच्छा होती.आज कान्हे ग्रामीण रुग्णालयाचा विस्तार होऊन उपजिल्हा रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर अशी भव्य इमारत उभी राहिली आहे. नवीन आराखड्याप्रमाणे सुसज्ज असे रुग्णालय सर्वसामान्य नागरिकांना सक्षम आरोग्य सेवा देण्यासाठी सज्ज होत आहे.यामुळे तालुक्यातील सार्वजनिक आरोग्यसेवेला बळकटी मिळणार आहे.



हे रुग्णालय आंदर मावळसह ग्रामीण भागातील रुग्णांना एक उत्तम आरोग्यसेवा देणारे मध्यवर्ती केंद्र ठरणार असल्याचा विश्वास आमदार सुनिल शेळके यांनी व्यक्त केला.



# सांगलीतील सर्व शाळांमध्ये ३० सप्टेंबर पूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करा!

## पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांचे निर्देश

विद्यार्थी सुरक्षा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. यासंबंधी जिल्हास्तरावर अंमलबजावणी केली जात आहे. दरम्यान, शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेबाबत संबंधित यंत्रणांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. सर्व शासकीय व खाजगी शाळांमध्ये ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते कार्यान्वित करावेत. असे निर्देश सांगलीतील पालकमंत्री सुरेश खाडे यांनी दिले.

बदलापूर ते राज्यातील विविध शाळेतील लैंगिक शोषणाच्या प्रकरणानंतर विद्यार्थी सुरक्षा हा महत्वाचा मुद्दा झाला आहे. त्यामुळे राज्य शासनाने यासंबंधी महत्वाचे निर्देश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी जिल्हास्तरावर वेगाने केली जात आहे. सांगली जिल्हासंबंधीही पालकमंत्र्यांनी यासंबंधीचे निर्देश दिले आहे.

सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा विद्यार्थी सुरक्षा समितीची बैठक संपन्न झाली. त्यावेळी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी निर्देश दिले की, शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सुरक्षेबाबत संबंधित यंत्रणांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. सर्व शासकीय व खाजगी शाळांमध्ये



३० सप्टेंबर २०२४ पूर्वी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून ते कार्यान्वित करावेत.

या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी नंदिनी घाणेकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड, अविनाश गुरव, रावसाहेब पाटील यांच्यासह समिती सदस्य व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, शालेय विद्यार्थ्यांच्या विशेषतः मुलींच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजनांसंदर्भात शासन स्तरावरून वेळोवेळी आदेशित करण्यात आले आहे. त्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. शाळेतील सर्व कर्मचारी, शिक्षकांचे पात्रता प्रमाणपत्र बंधनकारक असून सर्वांची चारित्र्य पडताळणी करून घ्यावी. जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी विविध माध्यमातून प्राप्त निधी विचारात घेवून उर्वरित आवश्यक निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून प्राप्त करून घेण्यासाठी तात्काळ प्रस्ताव दाखल करावा. १०० टक्के शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करण्याची दक्षता घ्यावी. शाळांमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने वचक निर्माण करावा. दोषींवर कडक कारवाई करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत दिलेल्या सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनीही विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत दिलेल्या सूचनांची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. **यावेळी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड यांनी जिल्हा विद्यार्थी सुरक्षा समितीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांच्यामार्फत आर्थिक हातभार लावून जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, गणेश मंडळे, शिक्षक व कर्मचारी संघटना यांच्याकडूनही यासाठी मदत मिळणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**

**नारायण परब**

# भिमा कारखाना सेवा निवृत्त कामगार आक्रमक

**दौंड :** भिमा साखर कारखाना सेवानिवृत्त कामगारांनी थकीत पगार व फायनल पेमेंट अशा विविध स्वरूपातील अंदाजे ५० कोटी रुपये येणे आहे. ते येणे बाकी त्वरित मिळावे. येत्या ३० सप्टेंबरच्या आत सेवानिवृत्त कामगारांची देण्यात यावी. अन्यथा २ ऑक्टोबर पासून कारखान्याच्या गेट समोर साखळी उपोषणासह तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा सेवानिवृत्त कामगारांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

दरम्यान , कारखान्या प्रशासनाच्या विरोधात कामगारांनी पहिल्यांदाच एवढी आक्रमक भूमिका घेतली असुन कामगारांना तालुक्यातील सर्व स्तरातून मोठा पाठिंबा मिळत आहे. भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या सेवानिवृत्त कामगारांची कारखाना स्थळा शेजारी असलेल्या श्री गणेश मंदिरात सोमवारी (दि ९) बैठक पार पडली. या बैठकीत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार काही ठोस आणि आक्रमक भूमिका घेण्याचा निर्णय घेण्याचा यावेळी निर्णय घेण्यात आला. याबाबत कारखाना प्रशासन, साखर आयुक्त , कामगार आयुक्त तसेच कामगार मंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात म्हटले आहे की, भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या ४५० ते ५०० सेवानिवृत्त कामगारांना सेवानिवृत्त झाल्यानंतर सन २०१५ पासून फायनल पेमेंट व थकीत पगार मिळालेला नाही. अंदाजे ५० कोटी रुपये येणे बाकी आहे. ५०० सेवा निवृत्त कामगारांपैकी ४० कामगारांचे निधन झालेले आहे. थकीत देणी मिळावे यासाठी कारखाना प्रशासनाकडे वारंवार लेखी मागणी करूनही पैसे दिले नाहीत. भीमा साखर कामगार संघ ही कामगारांची प्रातिनिधिक युनियन असून त्यांनीही वारंवार मागणी करून अद्यापपर्यंत पैसे दिलेले नाहीत. सध्या सेवानिवृत्त कामगारांना उपासमारीची वेळ आलेली आहे. प्रॉव्हिडंट फंड न भरल्याने अंदाजे दोनशे लोकांना पेन्शनही चालू झालेली नाही. कारखान्यासाठी घाम गाळणाऱ्या कामगारांना उपासमारीची वेळ आली आहे.

त्यामुळे थकीत पगार,ले ऑफ मधील पगार, १५ टक्के व १२ टक्के त्रिपक्षीय वेतन वाढ पगार फरक, ग्रॅच्युइटीची रक्कम, रजेचा पगार,बोनस,प्रॉव्हिडंट फंड भरणा न केलेला, पगारातून कपात केलेली कामगारांची पतपेढीची कर्ज वसुली व हप्ते वसुली, पगारातून इन्शुरन्स हप्ता वसूल केलेली रक्कम व इतर अनेक देणी ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी देण्यात याव्यात. अन्यथा महात्मा गांधी जयंती (दि.२) पासून कारखाना मेन गेट समोर चक्री उपोषण करणार येईल . होणाऱ्या परिणामांची जबाबदारी ही कारखाना व्यवस्थापकांची राहील. असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या बैठकीत कामगार संघाचे माजी अध्यक्ष शिवाजी काळे,तुकाराम शितोळे,हनुमंत वाबळे, शहाजी जाधव,संजय शितोळे,शिवाजी दिवेकर यांच्यासह सेवानिवृत्त कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मनोज जरांगे यांच्या विरोधात बार्शीत मराठा समाजाचे आंदोलन

**सोलापूर :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या हेतूविषयी शंका उपस्थित करून बार्शीचे भाजपपुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी आरोपांचे सत्र सुरू केले असतानाच आता मराठा आंदोलकांकडूनदेखील बार्शीत जरांगे यांच्याविरुद्ध आंदोलन सुरू केले आहे. मराठा आरक्षण चळवळीतील नेते अण्णासाहेब शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनात अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले असून, त्यांनी जरांगे यांना ११ प्रश्न विचारले असून, त्यांचे उत्तर देण्याचे आवाहन केले आहे.



बार्शी शहरात शिवसृष्टीजवळ सुरू झालेल्या या ठिय्या आंदोलनात अण्णासाहेब शिंदे यांच्यासोबत अन्य मराठा कार्यकर्तेही सहभागी झाले आहेत. त्यांनीही जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाच्या हेतूविषयी शंका घेणारे प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांतील काही प्रश्न असे - महायुतीचे सरकार ओबीसीतून आरक्षण देऊ शकत नाही. म्हणून जरांगे यांनी लोकसभेवेळी महायुतीच्या विरोधात भूमिका घेतली. महाविकास आघाडीतील सर्व पक्षांनी जरांगेंच्या मदतीने लोकसभेला पाठिंबा मिळवत यश मिळवले. मात्र, या पक्षांनी अद्याप मराठा समाजास ओबीसींमधून आरक्षण द्यावे की नाही याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर का केलेली नाही? लोकसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचे ३१ खासदार निवडून आणण्यात मदत केली. या सर्व ३१ खासदारांनी समाजाची मते घेत विजय मिळवला; तरी त्यातील कोणीही अद्याप मराठा समाजास ओबीसींमधून आरक्षण द्यावे याबाबत स्पष्ट भूमिका जाहीर का केलेली नाही?

आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलन सुरू असताना राजकीय भूमिका घेत जरांगे यांनी महायुतीच्या विरोधात प्रचार सुरू केला आहे. यातून उद्या राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यावर ते मराठा समाजास ओबीसींमधून आरक्षण देणार आहेत का? ते आरक्षण देणार असल्यास कसे आणि किती दिवसांत देणार? त्याबाबतचे काही आश्वासन जरांगे यांना आघाडीने दिले आहे का? आंदोलनामुळे मिळालेले आरक्षण रद्द झाल्यास आणि ओबीसींमधून आरक्षण मिळण्यात अडचणी आल्यास त्याची जबाबदारी जरांगे घेणार आहेत का? समाजात मुस्लीम-मराठा वाद पूर्वीपासून आहे. त्यानंतर मराठा-दलित वाद झाला. आता मराठ्यांचे ३०० हून अधिक ओबीसींबरोबर वैमनस्य निर्माण होण्याची वेळ आली आहे. समाजातील अन्य सर्व जातींबरोबर तयार झालेल्या या वादास जबाबदार कोण? देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने पूर्वी मराठा समाजास स्वतंत्र आरक्षण मिळवून दिले होते. हे आरक्षण उच्च न्यायालयात टिकले. मात्र, सत्ताबदलानंतर महाविकास आघाडी सरकारच्या काळात ते सर्वोच्च न्यायालयात टिकले नाही. यास कोण जबाबदार आहे? त्याबाबत जरांगे यांची भूमिका काय आहे? या प्रकारचे ११ प्रश्न या वेळी आंदोलकांकडून जरांगे यांना विचारण्यात आलेले आहेत. या प्रश्नांची उत्तरे जरांगे यांनी अद्याप दिलेली नसल्याचे अण्णासाहेब शिंदे यांनी सांगितले. ही उत्तरे देणे त्यांनी टाळल्यास त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमस्थळी याबाबत मराठा समाजाचे आंदोलक त्यांना विचारणा करणार असल्याचेही शिंदे यांनी या वेळी जाहीर केले.

# मिरजेत पैगंबर जयंतीची मिरवणूक लांबणीवर



**सांगली :** मिरजेत पैगंबर जयंतीची मिरवणूक लांबणीवर, गणेशोत्सव - पैगंबर जयंती एकाच दिवशी आल्याने निर्णय (संग्रहित छायाचित्र)

सांगली : यंदा गणेशोत्सव आणि पैगंबर जयंती एकाच दिवशी आले असल्याने मिरजेत पैगंबर जयंतीची मिरवणूक दोन दिवस पुढे ढकलून हिंदू-मुस्लीम ऐक्याचा संदेश देण्याचा निर्णय जुलूस कमिटीने घेतला असल्याचे कमिटीचे असगर शरीकमसलत यांनी मंगळवारी सांगितले.

पैगंबर जयंती म्हणजेच ईद-ए-मिलाद हा मुस्लिमांचा सण १६ सप्टेंबर रोजी आहे. याचवेळी गणेशोत्सव साजरा होत आहे. गणेश विसर्जन आणि पैगंबर जयंती निमित्त मिरवणुकीचा मिरजेत एकच मार्ग आहे. गणेशोत्सव आणि पैगंबर जयंती उत्साहात साजरी करता यावी, दोन्ही धर्माच्या सणांना कोणतेही गालबोट लागू नये यासाठी पैगंबर जयंतीची मिरवणूक गणेश विसर्जन झाल्यानंतर म्हणजे १९ सप्टेंबर रोजी काढण्याचा निर्णय जुलूस कमिटीने घेतला आहे, असे शरीकमसलत यांनी सांगितले. यावेळी माजी नगराध्यक्ष ए.जी. नदाफ, महमंद सतारमेकर, सलिम मगदूम उपस्थित होते.

पैगंबर जयंतीची मिरवणूक १९ सप्टेंबर रोजी मिरजेतील बाराइमाम दर्ग्यापासून सकाळी आठ वाजता निघणार असून निर्धारित मार्गाने मिरासाहेब दर्ग्याजवळ सांगता होणार आहे. प्रार्थनेनंतर महाप्रसादाची व्यवस्था जुलूस कमिटीच्यावतीने करण्यात आल्याचे शरीकमसलत यांनी सांगितले.

# मनोज जरांगे यांच्या आंदोलनातून आघाडीला सत्तेत आणण्याचा डाव, अ.राजेंद्र राऊत

**सोलापूर :** बार्शीचे भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत यांनी गेल्या काही दिवसांत मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर संशय व्यक्त करत हल्ला चढवला आहे. यामध्ये राऊत यांनी सोमवारी पुन्हा एकदा जरांगे यांच्यावर कठोर शब्दात प्रहार केला. जरांगे हे आंदोलन आरक्षणासाठी करत नसून यातून त्यांचा महाविकास आघाडीला सत्तेत आणण्याचा डाव आहे. याबाबत सगळ्या जनतेलाच आता संशय निर्माण झाला असल्याची टीकाही राऊत यांनी या वेळी केली.

बार्शीत प्रसार माध्यमांशी बोलताना आमदार राऊत यांनी जरांगे यांच्या मराठा आंदोलनावर शंका उपस्थित करीत, त्यांचे आंदोलन मूळ हेतूपासून वेगळ्या मार्गाने भरकटल्याचा आरोप केला. बार्शीत मराठा कार्यकर्त्यांनी जरांगे-पाटील यांना मराठा आरक्षणासंदर्भात विविध अकरा प्रश्न उपस्थित करून आंदोलन सुरू केले आहे. त्याची उत्तरे जरांगे-पाटील यांनी द्यावीत, अशी मागणी आमदार राऊत यांनी केली.

राऊत म्हणाले, की मी यापूर्वी मराठा आरक्षण प्रश्नावर आंतरवाली सराटीत अनेकवेळा जाऊन मनोज जरांगे यांच्याशी चर्चा केली होती. परंतु गेल्या ११ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बार्शीत येऊन आपले विरोधक माजी मंत्री दिलीप सोपल यांची भेट घेतली. त्यानंतर आपण राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यावर टीका केली होती. तेव्हापासून जरांगे हे आपल्याविरुद्ध भाष्य करीत आहेत, असा आरोप आमदार राऊत यांनी केला.

मराठा आरक्षण आंदोलन अलीकडे वेगळ्या दिशेने भरकटले असताना आंदोलन करण्यासह जरांगे-पाटील यांनी खुल्या चर्चेची दारे उघडी ठेवली पाहिजेत.

# शिवसेनेचा आमदार असलेल्या मतदारसंघावर राष्ट्रवादीचा दावा कायम

**रायगड :** कर्जत मतदार संघावर राष्ट्रवादीचा दावा कायम, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे संकेत (छायाचित्र - लोकसत्ता ग्राफिक्स टीम)

अलिबाग : कर्जत विधानसभेच्या जागेसाठी राष्ट्रवादी कडून तयारी सुरू झाल्याने विद्यमान आमदार शिवसेनेचे महेंद्र थोरवे आक्रमक झाले आहेत. असे असले तरी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी या मतदारसंघावरील दावा नाकारला नाही. त्या संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री मी स्वतः प्रदेशाध्यक्ष म्हणून एकत्रित बसून घेवू असं स्पष्ट करतानाच सुनील तटकरे यांनी या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा अद्यापही असल्याचे संकेत दिले.

आज सुतारवाडी येथील निवासस्थानी ते पत्रकारांशी बोलत होते. लोकसभा निवडणूकीत रायगड लोकसभा मतदार संघातील सर्वच विधानसभा मतदार संघात महायुतीमधील घटक पक्षांनी एकत्रितपणे काम केलं. त्याची परीणिती मोठे मताधिक्य लोकसभेत मिळालं. इथल्या सर्वच मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्णपणे महायुतीचे काम करील. राहता राहिला प्रश्न कर्जतचा तेथे राष्ट्रवादी काँग्रेसचे सुधाकर घारे इच्छुक आहेत. राज्यात असे अनेक राष्ट्रवादीचेही मतदारसंघ आहेत जेथे शिवसेनेचे नेते इच्छुक आहेत. परंतु त्या संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, मी स्वतः प्रदेशाध्यक्ष म्हणून एकत्रित बसून घेवू असं सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले.

जर कर्जतमध्ये लुडबुड केली तर आम्ही श्रीवर्धनमध्ये प्रमोद घोसाळकर यांना उभे करू असा इशारा कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे यांनी दिला होता. खुद्द प्रमोद घोसाळकर यांनीही तशी तयारी दर्शवली आहे. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले की श्रीवर्धनबाबत कुणी वायफळ बडबड करत असेल तर त्यांची नोंद त्यांचे नेते भरत गोगावले, महेंद्र दळवी, योगेश कदम घेतील. अशा किरकोळ माणसांच्या तयारीबद्दल मला बालायचे नाही. वक्तव्याची दखल घेण्याच्या क्षमतेचे नाहीत त्याबददल मला अवाक्षर बोलायचे नाही असा टोला तटकरे यांनी शिवसेना जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर यांना लगावला. महाड, पेण, अलिबाग, दापोली या सर्व मतदार संघात युतीचा धर्म पाळून माझ्याकडून पूर्ण ताकदीने काम केले जाईल, असेही तटकरे यांनी स्पष्ट केले.

# केशवराव भोसले नाट्यगृह पुनर्बांधणी कागदावर!

## निधीच्या केवळ घोषणाच, चौकशी समितीकडून यंत्रणाही दोषमुक्त

**कोल्हापूर :** कोल्हापूरचे सांस्कृतिक वैभव असलेले संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह आगीत बेचिराख झाल्यानंतर मुख्यमंत्री, महापालिका प्रशासन, सर्वपक्षीय नेते यांनी पूर्वीच्या वैभवाला साजेशी पुनर्बांधणी करण्याची घोषणा केली. महिन्याभरानंतर एकूणच प्रवास कूर्मगतीने सुरू आहे. निधीच्या घोषणा करून वेळ मारून नेली जात आहे. आगीचे कारण शोधण्यासाठी नियुक्त केलेल्या महापालिकेच्या समितीला आगीचे धड कारणही शोधता आले नाही. आपल्याच यंत्रणेला दोषमुक्त करणारी ही कृती असल्याची टीका केशवराव भोसले नाट्यगृह पुनर्बांधणी व संवर्धन कृती समितीने केली आहे. पोलीस तपासातून काहीही निष्पन्न झालेले नाही.

राजर्षी शाहू महाराज यांनी उभारलेल्या संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला ८ ऑगस्ट रोजी रात्री आग लागली. ऐतिहासिक ठेवा नजरेसमोर बेचिराख होताना पाहण्याची वेळ कोल्हापूरकरांवर आली. त्यामुळे नाट्यगृहाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या कोल्हापूर महापालिकेवर टीकेचा आगडोंब उसळला. पाठोपाठ बड्या नेत्यांचे दौरे होऊन घोषणांचा वर्षाव झाला. नाट्यगृह बांधणीसाठी २५ कोटींचा निधी देण्याची घोषणा एकनाथ शिंदे यांनी केली. या कामासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आश्वासन दिले. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सतेज पाटील यांनी काँग्रेसच्या आमदार -खासदार यांच्याकडून



पाच कोटी रुपयांचा निधी देण्याचे पत्र जिल्हा नियोजन समितीकडे सादर केले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही एक कोटीचा निधी द्यावा, असे पत्र सादर केले. कोल्हापूरकरांनी नाट्यगृह बांधण्यासाठी निधी संकलित करण्याची तयारी दर्शवली आहे.

महापालिकेची कुचराई

एकूणच नाट्यगृहाच्या पुनर्बांधणीसाठी निधीची कमतरता दिसत नाही. मात्र गेल्या महिन्याभरात याबाबतच्या हालचाली कूर्मगतीने सुरू आहेत. नाट्यगृहाच्या ठिकाणचा मलबा विम्याच्या कायदेशीर बाबीचे कारण देऊन कोल्हापूर महापालिकेने तसाच ठेवला आहे. आग लागल्यानंतर गुन्हा दाखल करण्यासाठी रंगकर्मी, सामाजिक कार्यकर्त्यांनाच कंबर कसावी लागली. दबावामुळे उशिरा जाग आलेल्या महापालिका प्रशासनाने अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या दोन्हीबाबत कोल्हापूर महापालिकेची कुचराई प्रकर्षाने पुढे आल्याने त्या विरोधात तीव्र टीका होत आहे.

सादरीकरणाबाबत मतभेद

समाधानाची एकच गोष्ट म्हणजे नाट्यगृह उभारणीबाबत जिल्हा प्रशासनाकडून हालचाली सुरू आहेत. याचे प्राथमिक सादरीकरण नुकतेच झाले आहे. नाट्यगृह कशा पद्धतीने उभारले पाहिजे हेच सांगितले गेले नसल्याने वेगवेगळ्या रूपातील सादरीकरण झाले. त्याबाबत रंगकर्मींमध्ये मतांतरे असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत दिसून आले. काहींनी नाट्यगृह पूर्वीप्रमाणेच उभारले पाहिजे असे मत व्यक्त केले आहे. तर काहींनी काळाशी सुसंगत ठरणारे अद्ययावत नाट्यगृह उभारले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. हा तिढा सोडवणे हे शासन - प्रशासनासमोरची डोकेदुखी ठरणार असे दिसत आहे.

लोकांचा आवाज रस्त्यावर

नाट्यगृह पुनर्बांधणीकडे दुर्लक्ष होत असल्याने लोकांचा आवाज रस्त्यावर येऊ लागला आहे. केशवराव भोसले नाट्यगृह पुनर्बांधणी व संवर्धन कृती समितीने मेणबत्ती पेटवून प्रशासनाचा निषेध केला आहे. या कृती समितीचे अध्यक्ष बाबा इंदुलकर म्हणाले, राजर्षी शाहू महाराज यांनी उभारलेल्या नाट्यगृहाच्या अस्मितेला गोंजारण्याचे काम राजकारण्यांनी चालवलेले आहे. विधानसभा निवडणुकीत या मुद्द्याचा फटका बसू नये यासाठी घोषणा करून वेळ मारून न्यायचे काम चालवलेले आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी सर्वांना विश्वासात घेऊन पुनर्बांधणी केली जाईल, असे आश्वासन दिले असले तरी प्रशासनाच्या कृतीमध्ये त्याचा अभाव जाणवत आहे. एकूणच याबाबतीत कोल्हापूरकरांची फसवणूक सुरू असून शासनाला गांभीर्य दिसत नाही, अशी टीका त्यांनी केली.